नि.फौ.ख.क्र. १६/२०२२
सरकार वि. धिरज
नि.क्र. २४

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव – देविदास फागोजी कुंभले,
वय – ५२ वर्ष, व्यवसाय – शेती,
राहणार – भुगाव, तह. कामठी, जिल्हा – नागपुर.

सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा

१. मी न्यायालयासमक्ष हजर दोन्ही आरोपी माझ्या घरासमोर राहत असल्यामुळे मी त्यांना ओळखतो. घटना दिनांक २२.१०.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता माझ्या घराच्यासमोर घडली होती. सदर वेळेस आरोपी त्यांच्या घरी स्लॅबवर अर्ध विट काढुन पॅरापिट टाकण्याचे काम करीत होते. त्यावेळेस मी दोन्ही आरोपींना तुमच्या स्लॅबच्या बाहेर न जाता पॅरापिटचे काम करा असे बोलले असता त्यांनी मला वरुन विटा फेकुन मारायला सुरवात केली. त्यांनी माझ्यावर पाच ते सहा विटा फेकुन मारल्या त्यापैकी दोन विटा माझ्या डोक्याला लागल्या. त्यामुळे माझ्या डोक्याला जखम होवुन रक्त निघायला लागले. त्यामुळे मी पोलीस स्टेशनला जावुन आरोपींविरुध्द तक्रार दिली. आता मला सदरची तक्रार दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक पी २५** देण्यात येत आहे. आता मला माझ्या फिर्यादच्या अनुशंगाने नोंदविलेली छापील वर्दी दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशानी क्रमांक पी २६** देण्यात येत आहे. फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी मला मौदा येथे सरकारी दवाखान्यात उपचाराकरिता पाठविले. त्यानंतर पोलीस चौकशीकामी गावात आले होते. त्यांनी माझे बयान नोंदविले होते. ज्या विटा आरोपींनी मला फेकुन मारल्या होत्या त्या मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दोन अर्धवट विटांचे तुकडे दाखविण्यात आले. सदरचे तुकडेच आरोपींनी

मला मारण्याकरिता वापरले होते. त्यांना ओळखीकरिता **आर्टिकल 'अ'** देण्यात येत आहे. दोन्ही आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री. एस.एस. राव यांच्यातर्फे –**

२. माझ्या जन्मापासुन आरोपी माझ्या घरासमोरच राहतात. आरोपींचे घर माझ्या घराच्या समोर आहे. हे म्हणणे खरे आहे की त्यांनी त्यांच्या घरात एक मजली बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की सदरचे बांधकाम त्यांनी आर्टिकल अ वरील विटासारख्या विटेनेच केले आहे. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे आर्टिकल अ वरील विटा सारख्या विटाचे तुकडे त्यांच्या घरात सर्व भुतळावर आहेत. हे म्हणणे खरे आहे की आरोपींनी माझ्याविरुध्द ग्रामपंचायतीत तक्रार केलेली आहे. साक्षदार स्वतःहुन सांगतो की मी देखील त्यांच्याविरुध्द तक्रार केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या दोघांच्या सांगण्यावरुन ग्रामपंचायतचे पाच ते सहा लोकं घटनास्थळी आले होते. साक्षदार स्वतःहुन सांगतो की त्यावेळेस आरोपींनी घर बांधण्यास सुरवात केलेली नव्हती.

३. हे म्हणणे खरे आहे की त्यांच्या जागेचे क्षेत्रफळ मोजणी करुन घेण्याकरिता आरोपींनी अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की त्या अनुशंगाने मोजणीकरिता काही लोकं त्याच्या घरी आले होते. मला हे माहीत नाही की आरोपींनी ग्रामपंचायतकडे दिलेल्या तक्रारीत काय मजकुर नमुद केला होता. मला सदर तक्रारीमधील मजकुर माहीत नसल्यामुळे मान्य नाही. सदर तक्रार केल्यानंतर मला ग्रामपंचायतकडुन नोटीस मिळाला होता. हे म्हणणे खरे नाही की सदर तक्रारमध्ये त्यांनी मी माझ्या घराच्या मागच्या ग्रामपंचायतीच्या मालकीचा असलेला सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे सदर अतिक्रमण काढण्याबद्दल लिहीलेले होते.

४. माझ्या घरापासुन पोलीस स्टेशन १५ किलोमिटरच्या अंतरावर आहे. पोलीसांनी मला घटनेबद्दल दोनदा विचारणा केली होती. आरोपींनी माझ्याविरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार केली नाही. पोलीस घटनेच्या दुस–या दिवशी घटनास्थळी चौकशीकामी आले होते. माझ्या घराच्या आजुबाजुला रामदास कुंभले, गणपत कुंभले, संपत कुंभले, संतोष जयस्वाल, विनोद लांजेवार, सचिन करन उके वगैरे यांचे घरे आहेत. सदरचे लोकं आमच्याच कुटुंबाचे आहेत. या सर्व लोकांसोबत माझे चांगले संबंध आहेत.

५. आरोपी स्लॅबचे काम अर्ध विट काढुन करीत असल्याचे दाखविण्याकरिता मी त्यावेळेस सदर बांधकामाचे फोटो काढले होते.
प्रश्न – तुम्ही आजपर्यंत आरोपींना त्यांच्या घराच्या प्लास्टरचे काम करु दिले नाही ?
उत्तर – त्यांनी मोजणी केल्यानंतर त्यांच्या घराच्या मागे एक इंच जागाही सोडली नसल्याने त्यांना मागे येण्याचा कोणताच अधिकार नाही.

६. आरोपींच्या घराचे क्षेत्रफळ किती आहे ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपींच्या घरामागे त्याची पुष्कळ जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की जागा असल्या कारणाने तो प्लास्टर करण्याकरिता गेला असता मी त्याला प्लास्टर करण्यापासुन थांबविले. हे म्हणणे खरे नाही की मीच आरोपी धिरजला शिविगाळ करुन मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की धिरजने माझ्याविरुध्द तक्रार केल्यामुळे स्वतःला शिक्षेपासुन वाचविण्याकरिता मी आरोपींविरुध्द खोटी तक्रार केली.

७. आरोपींनी बांधलेले स्लॅब १२ फिट उंचीवर आहे. मला हे माहीत नाही की आर्टिकल अ वरील विटाचा तुकडा जर १२ फुट उंचीवरुन माझ्या डोक्यावर फेकला असता तर मला जास्त मार लागला असता. हे म्हणणे खरे नाही की

पोलीसवाल्यांशी माझी ओळख असुन मी त्यांच्याशी संगनमत करुन आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी त्यांच्या घराच्या मागे प्लास्टरचे वगैरे काम करु नये म्हणुन त्यांना अडकविण्याकरिता मी ही खोटी रिपोर्ट दिली.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष

मौदा.

दिनांक १६.०१.२०२४ (ए.बी. कादियन )

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा